# वासंती संगीत संस्था

**विद्युत कॉलनी, बेगमपुरा, औरंगाबाद, महाराष्ट्र.**

नोंदनी क्रमांक ( महा.५९३/१६ ) Rg.no एफ २४५५९

| अध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष | सह कोषाध्यक्ष |
|---|---|---|---|
| सौ. संगीता बाराबोटे | श्री. प्रशांत बाराबोटे | श्री. राहुल ज्ञाते | श्री. अविनाश थिगळे |
| 8788339740 | 9822826558 | 7767017724 | 9822197559 |


दिनांक - १३/ ४/२०१८

प्रति,
**मा. संगीत विभागप्रमुख,**
संगीत विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय : संगीत विभाग आणि वासंती संगीत संस्था (रजी क्र. एफ २४५५१ ) यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिध्द तबलावादक पं.अरविंदकुमार आज़ाद यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेच्या आयोजनाबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयी विनंती की, मी प्रशांत बाराबोटे सचिव वासंती संगीत संस्था औरंगाबाद सादर करतो की वासंती संगीत संस्था ही भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रचार आणि प्रसारासाठी कटीबध्द असलेली नोंदणीकृत संस्था आहे. मागील १० वर्षापासून आम्ही विविध संगीत उपक्रमाचे आयोजन कीरत असतो. भारतीय शास्त्रीय संगीत सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचावे असे उदात्त ध्येय ठेऊन आमचे कार्य चालू आहे. या ध्येयातूनच दोन वर्षापूर्वी या संस्थेची नोंदणी केल्या गेली आहे.

दि. ३०/०४/२०१८ व ०१/०५/२०१८ रोजी बनारस घरण्याचे प्रसिध्द तबलावादक पं. -अरविंदकुमार आज़ाद (पुणे) यांचे दोन दिवसीय तबला वादन कार्यशाळा आपल्या संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने घेऊ इच्छीतो या कार्यशाळेचा लाभ संगीत प्रेमी रसिकांना होइचल त्याच बरोबर आपल्या विभागातील विद्यार्थ्यांना देखील होईल. प्रस्तुत कार्यशाळा ज्ञानवृध्दतीच्या दृष्टीकोनातून मोलाची ठरणार आहे.

या कार्यशाळेचा संपूर्ण खर्च आमची संस्था करणार असून आपल्या संगीत विभागात सदर कार्यशाळा संपन्न होणार आहे. तरी कृपया आपण या तबला वादन कार्यशाळेला संगीत विभाग व वासंती संगीत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्याची परवानगी द्यावी ही विनंती.

आपला विश्वासु,

प्रशांत बाराबोटे

~~अध्यक्ष~~ सचिव
वासंती संगीत संस्था
विद्युत कॉलनी, बेगमपुरा, औरंगाबाद.